सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या**
**निवडणुकांसाठी आचारसंहितेबाबत**
**एकत्रित आदेश**

**क्रमांक-स्थास्वसं-२०११/प्र.क्र.२५/का-५,**
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २९ डिसेंबर, २०११

## आदेश

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक- २४ डिसेंबर, २००७ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी आचारसंहितेची अंमलबजावणी कशी करावी, यासंबंधी एकत्रित आदेश काढले आहेत. ते आदेश काढल्यानंतर त्यास अनुसरुन काही पूरक आदेशही काढण्यात आले आहेत. राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची आचारसंहिता परिणामकारक होण्याच्यादृष्टीने दिनांक २४ डिसेंबर, २००७ चे एकत्रित आदेश व त्या अनुषंगाने काढलेले पूरक आदेश रद्द करून नव्याने आचार-संहितेसंबंधी एकत्रित आदेश काढण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतला आहे.

**२. पार्श्वभूमी :-** पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक-२७०/१९९७ श्री. हरबन्सलाल जलाल विरुध्द भारत सरकार, भारत निवडणूक आयोग व इतर या दाव्यामध्ये दिलेल्या निर्णयानुसार निवडणूक आयोगाला निवडणुका मोकळया वातावरणात व योग्यरितीने व्हाव्यात यासाठी निवडणुकीची अधिसूचना निघण्याच्या पूर्वीपासून आदर्श आचारसंहिता लावण्याचे अधिकार आहेत व तिचे पालन सर्व राजकीय पक्षांनी करणे आवश्यक आहे असे नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयाने स्पेशल लिव्ह पिटिशन (सिव्हिल) क्रमांक-२२७२४/१९९७ यामध्ये भारत सरकार व भारत निवडणूक आयोग यांच्यामध्ये दिनांक- १६ एप्रिल, २००१ रोजी झालेल्या करारानुसार पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाने रिट याचिका क्रमांक- २७०/१९९७ मध्ये दिलेल्या आदेशांबाबत पुढे काही आदेश देण्याची आवश्यकता नाही, असे म्हटले आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, भारत निवडणूक आयोगाने काढलेल्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेसंबंधी आदेशांवर आधारित सर्वसाधारण आचारसंहितेसंबंधी नवीन आदेश काढावेत.

**३.** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेची अंमलबजावणी प्रभावीपणे व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ ए (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १४(४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड) च्या कलम ९-बी (४), महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ, पारदर्शक, मोकळया व भयमुक्त वातावरणात व्हाव्या यासाठी अशा आचारसंहितेच्या अंमलबजावणीसंबंधी राज्य निवडणूक आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**(१) अंमलात येण्याचा दिनांक -** हे आदेश दिनांक- १ जानेवारी, २०१२ नंतर होणाऱ्या सर्व निवडणुकांसाठी लागू होतील.

**(२) आचारसंहितेचे क्षेत्र -** सार्वत्रिक निवडणुकीची आचारसंहिता स्थानिक स्वराज्य संस्थेच्या संपूर्ण क्षेत्रासाठी लागू राहील व पोटनिवडणुकीची आचारसंहिता संबंधित प्रभाग किंवा संबंधित निवडणूक विभाग किंवा संबंधित निर्वाचक गण यांच्यापुरतीच लागू असेल.

**(३) आचारसंहितेची सुरुवात -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आचारसंहिता राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्यापासून लागू होईल. या आचारसंहितेचे सर्वसाधारणपणे दोन टप्पे असतील. पहिल्या टप्प्यात म्हणजे राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका जाहीर केल्यापासून ते नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्याच्या आदल्या दिवसापर्यंत, संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत तसेच या संस्थांनी कोणतेही धोरणात्मक निर्णय घ्यावयाचे झाल्यास त्याबाबत राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घेण्यात यावी. हा धोरणात्मक निर्णय राज्य शासन अथवा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यापैकी कोणीही घ्यावयाचा असल्यास त्यांना हे आदेश लागू होतील. आचारसंहितेचा दुसरा टप्पा नामनिर्देशनपत्र स्वीकारण्यास सुरुवात झाल्यापासून सुरु होईल. या कालावधीत कोणतेही धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. त्यामुळे यासंदर्भातील कोणत्याही स्वरूपाचा प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविण्यात येऊ नये.

नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यास सुरुवात झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेता येणार नाहीत. निवडणुका जाहीर करतेवेळी जी कामे प्रत्यक्ष सुरु असतील ती तशीच पुढे चालू ठेवता येतील.

**(४) जाहीर प्रचाराचा कालावधी :-** स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये जाहीर प्रचार बंदीचा कालावधी विविध अधिनियम / नियमात वेगवेगळा नमूद केला आहे. त्यानुसार जाहीर प्रचार बंदीचा कालावधी पुढीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | जाहीर प्रचार बंदीचा कालावधी |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका | मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेला संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार बंद होईल |
| २ | नगरपरीषद / नगरपंचायत | मतदान सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचार बंद होईल. मात्र रात्री १०.०० नंतर सभा / मोर्चे / ध्वनीवर्धकाचा वापर करता येणार नाही. |
| ३ | जिल्हापरीषदा / पंचायत समित्या | मतदान सुरू होण्याच्या दिनांकापूर्वी २४ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेला रात्री १२.०० वाजता प्रचार बंद होईल. मात्र रात्री १०.०० नंतर सभा / मोर्चे / ध्वनीवर्धकाचा वापर करता येणार नाही. |
| ४ | ग्रामपंचायती | मतदान समाप्तीच्या ४८ तास अगोदर, म्हणजे १० तारखेस मतदान असल्यास ८ तारखेला संध्याकाळी ५.३० वाजता प्रचार बंद होईल |

**(५) दुष्काळ, पाणी टंचाई, गंभीररित्या आजारी असलेल्यांना मदत व सुरु असलेल्या योजना पुढे चालू ठेवणेबाबत -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये आचारसंहितेचे पालन सर्व संबंधितांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. आचारसंहितेचे पालन याचा अर्थ प्रामुख्याने निवडणुका जाहीर झालेल्या क्षेत्रातील मतदारांवर प्रभाव पाडणारे निर्णय निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षांनी घेऊ नयेत अथवा अशी कोणतीही कृती करु नये असा होतो. पण याचबरोबर हेसुध्दा आवश्यक आहे की, विकास कामांच्या योजना, ज्या सुरु होऊन काही प्रमाणात पूर्ण झाल्या आहेत त्या आचारसंहितेच्या कालावधीत बंद पडू नयेत. आचारसंहिता असल्याने एखादया ठिकाणी दुष्काळ असेल अथवा पाणी टंचाई असेल तर ती दूर करण्याबाबत कार्यवाही करु नये असा आचारसंहीतेचा अर्थ होत नाही.

जी कामे निवडणुका जाहीर होण्याआधीपासून प्रत्यक्षरित्या सुरु असतील ती तशीच सुरु ठेवता येतील. ज्या भागात दुष्काळी परिस्थिती अथवा पूर परिस्थिती असेल अशा भागामध्ये जनतेचे दुखः निवारणासाठी कामे हाती घेण्यास कोणतीही बंदी असणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पोटनिवडणुकांच्यावेळी ज्या कामांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद असेल व जे काम एखादया विशिष्ट भागांशी संबंधित नसेल असे कोणतेही काम हाती घेण्यास बंदी राहणार नाही. मात्र, ज्या कामांसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद नाही किंवा जी कामे एखादया विशिष्ट प्रभागासाठी सुरु होतात त्या कामांची सुरुवात करण्यापूर्वी किंवा त्यासाठी निविदा सूचना काढण्यापूर्वी राज्य निवडणूक

आयोगाची परवानगी आवश्यक असेल. सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी फक्त जी कामे आधीपासून सुरु असतील केवळ तीच पुढे सुरु ठेवता येतील.

महानगरपालिकेच्या बाबतीत नवीन कामांना परवानगीची विनंती करतांना महानगरपालिका आयुक्तांचे तर इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे स्पष्ट मत आवश्यक असेल.

मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे महानगरपालिकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांच्या व अन्य निवडणुकांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांच्या मान्यतेने चालू ठेवता येईल.

**(६) बदल्या :-** आचारसंहितेच्या काळात निवडणुकांशी संबंधित अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बदल्या करावयाच्या असल्यास त्याला राज्य निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/ १०९५/सी.आर-५/९५/डी-३, दिनांक १५/०३/१९९५ लागू रहातील. निवडणुकांशी संबंधित अधिकारी / कर्मचारी यामध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी/कर्मचारी, पोलिस अधिकारी वा निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी जसे, जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार इत्यादी यांचाही समावेश होतो.

**(७) उद्घाटन व समारंभ :-** निवडणुका जाहीर झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अथवा राज्य शासनाच्या खर्चाने पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन समारंभ इत्यादी मोठया प्रमाणात आयोजित करण्यात येतात व अशा कार्यक्रमांना पदाधिकाऱ्यांसोबत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांनादेखील उपस्थित राहण्याची सक्ती करण्यात येते, अशा तक्रारी आयोगाकडे प्राप्त होतात. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र शासनाच्या किंवा केंद्र शासन अथवा राज्य शासन यांच्या अधिपत्याखालील महामंडळाच्या खर्चातून पूर्ण झालेल्या कामांचा उपयोग जनतेसाठी तात्काळ व्हावा, यादृष्टीने समारंभ आयोजित न करतादेखील पूर्ण झालेली कामे जनतेच्या उपयोगासाठी खुली/सुरु करता येतील

आचारसंहिता जरी निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रापुरती लागू होणार असली तरी आजूबाजूच्या क्षेत्रात तेथील निवडणुकीवर परिणाम होऊ शकेल, असे कार्यक्रम आयोजित करता येणार नाहीत. उदा. जिल्हा परिषदेची जर निवडणूक असेल तर जिल्हयाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी जरी ते मुख्यालय ग्रामीण क्षेत्रात समाविष्ट होत नसले तरीही तेथे मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. तसेच महानगरपालिका अथवा नगर परिषद क्षेत्रात निवडणूक असताना त्याला लगतच्या ग्रामीण क्षेत्रात असा कार्यक्रम किंवा अशी कृती करता येणार नाही. त्याशिवाय, संपूर्ण राज्यामध्ये आचारसंहितेच्या कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदारांवर प्रभाव पडेल असा कार्यक्रम आयोजित करता येणार नाही.

**(८) उमेदवारांनी खर्चाचा हिशोब सादर करणेबाबत :-** नामनिर्देशनपत्र भरल्यापासून ते मतमोजणीपर्यंतच्या कालावधीत प्रत्येक उमेदवाराने निवडणुकीवर किती

खर्च करावा यासाठी आयोगाने मर्यादा घालून दिलेली आहे. तसेच दररोजच्या खर्चाचा हिशोब निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे **दुसऱ्या दिवशी दुपारी दोन वाजेपर्यंत** उमेदवाराने देणे आवश्यक आहे. तसेच निवडणुका पार पडल्यानंतर विहित कालावधीत सदर हिशोब व त्याबाबतचे शपथपत्र संबंधित अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे. यासंदर्भात नियमांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ आय नुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच जे उमेदवार राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी /१०९५/१०१/ डेस्क ३, दि.०७/०२/१९९५ नुसार विहित केलेल्या रितीने खर्चाचा हिशोब सादर करणार नाहीत अथवा **राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी विहित केलेल्या मर्यादेत खर्च करणार नाहीत असे उमेदवार अधिनियमातील तरतुदीनुसार अनर्हतेस पात्र आहेत.** त्यामुळे यासंदर्भातील सूचनांचे पालन काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा/२००६/प्र.क्र.१७/का.५, दिनांक २८/१२/२००६ च्या आदेशानुसार पक्षाने निवडणुकांकरिता केलेला खर्च त्या पक्षाच्या उमेदवारांमध्ये विभागून दाखवायचा आहे. तसेच या आदेशान्वये विहित करण्यात आल्याप्रमाणे पक्षाने आचारसंहिता सुरु झाल्यापासून ठराविक कालावधीत हा खर्च संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सादर करावयाचा आहे.

**(९) शासकीय दौरे व विश्रामगृहाच्या वापराबाबत :-** केंद्रीय मंत्री अथवा राज्याचे मंत्री आचारसंहिता कालावधीत जर आचारसंहिता लागू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात शासकीय दौऱ्यावर येणार असतील तर मंत्र्यांच्या खाजगी सचिवाने असा दौरा का आवश्यक आहे, या स्पष्टीकरणासह महानगरपालिका निवडणुकांच्या बाबतीत महानगरपालिका आयुक्तांना व इतर सर्व निवडणुकांच्या बाबतीत संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना किमान दोन दिवस आधी कळविले पाहिजे. अशा दौऱ्याला जोडून कोणताही खाजगी किंवा प्रचाराचा कार्यक्रम ठेवता येणार नाही.

तसेच विश्राम भवन (Circuit House/Rest House) द्यावे किंवा कसे, याची विचारणा होते. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, केंद्राच्या तसेच राज्य शासनाच्या मंत्रीमहोदयांना विश्राम भवन (Circuit House/Rest House) देण्यास हरकत नाही. तथापि, मंत्रीमहोदयांनी आपल्या शासकीय कामकाजासाठी काढलेल्या दौऱ्याची निवडणुकीच्या कामकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाच्यावेळी सरकारी यंत्रणा व कर्मचारीवर्ग यांचा वापर करु नये. शासकीय कामकाजासाठी काढलेल्या दौऱ्यात जर निवडणुकीशी संबंधित काहीही काम असेल त्यावेळी डी.व्ही.कार उपलब्ध असणार नाही. निवडणुकीशी संबधित कामामध्ये प्रचारसभा, पक्षाच्या बैठका, उमेदवार निवडीसंबंधी कोणतेही काम, कोणतीही राजकीय स्वरूपाची बैठक व इतर तत्सम बाबी यांचा समावेश होतो. तसेच सरकारी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांची वाहने व कर्मचारीवर्ग यांचा निवडणुकीच्या कामकाजासाठी कोणत्याही परिस्थितीत वापर करु नये.

शासकीय विश्राम भवन व विश्रामगृहे किंवा इतर शासकीय निवासी व्यवस्था मंत्री महोदयांना उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. तथापि, त्याचा वापर फक्त सत्ताधारी पक्ष किंवा त्यांच्या उमेदवारांसाठी असू नये आणि अशा निवासी व्यवस्थेचा वापर इतर पक्षांना किंवा उमेदवारांनाही न्याय्य पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात यावा. मात्र, कोणत्याही पक्षाला

किंवा उमेदवाराला विश्राम भवन, विश्रामगृहे अथवा अन्य कोणत्याही शासकीय / निमशासकीय संस्थांच्या इमारतीचा अथवा आवाराचा निवडणुकीच्या मोहिमेसाठी, उमेदवारांच्या मुलाखतीसाठी, बैठकीसाठी अथवा प्रचारासाठी किंवा निवडणुकीशी संबंधित पत्रकार परिषदेसाठी वापर करता येणार नाही. तसा वापर झाल्याचे निदर्शनास आल्यास अथवा कोणी निदर्शनास आणून दिल्यास महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी यांनी तात्काळ कार्यवाही करावी व असे प्रकार तात्काळ थांबविण्यात यावेत. आचारसंहितेच्या कालावधीत राज्य निवडणूक आयोगाचे अधिकारी / कर्मचारी यांनी निवडणुकीच्या कामासाठी जर विश्रामगृहात आरक्षण केले असेल तर ते कुठल्याही परिस्थितीत रद्द करता येणार नाही. अन्य शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी यांनी जर आरक्षण केले असेल तर ते राजकीय नेत्यांच्या निवडणूक दौऱ्याकरिता रद्द करता येणार नाही. **निवडणुकीच्या प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर ते निकाल लागेपर्यंत कोणत्याही राजकीय व्यक्तिस/नेत्यास विश्रामगृहाचा वापर करता येणार नाही, राजकीय नेत्यांमध्ये मंत्री, राज्यमंत्री यांचाही समावेश होतो.**

**(१०) वाहनांच्या वापराबाबत :-** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आचारसंहितेच्या कालावधीत महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी व इतर शासकीय अधिकारी अथवा इतर स्थानिक स्वराज्य संस्थेचे अधिकारी यांच्याकडून दौऱ्यावर असलेल्या मंत्री महोदयांना डी.व्ही. कार देता येणार नाही.

निवडणुकीच्या काळात प्रचार मोहिम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रचार करण्यासाठी शासकीय वाहनांचा वापर होणार नाही, याची दक्षता घ्यावयाची आहे. शासकीय वाहनांमध्ये केंद्र शासन, राज्य शासन, केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, केंद्र व राज्य शासनाचे संयुक्तिक क्षेत्र उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, पणन मंडळे, सहकारी संस्था, जिल्हा परिषदा अथवा पंचायत समित्या, ज्यामध्ये जनतेच्या पैशांची गुंतवणूक आहे, अशा अन्य कोणत्याही संस्था यांच्या वाहनांचा वापर करता येणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ज्या पदाधिकाऱ्यांना वाहनांच्या वापराची परवानगी असते अशा पदाधिकाऱ्यांना आचारसंहितेच्या काळात फक्त निवासस्थान ते कामकाजाचे ठिकाण एवढयाच वापराची परवानगी असेल. मात्र याचा अर्थ असा नाही की, सदर पदाधिकाऱ्यांची वाहने निवडणुकांच्या कामाकरिता महानगरपालिका आयुक्त अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांना अधिग्रहित करता येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यास सुरुवात झाल्यापासून सहकारी संस्था, पणन मंडळे, शैक्षणिक संस्था इत्यादींचीही वाहने वापरण्यावर बंदी असेल. अशा बंदीचे उल्लंघन होताना आढळल्यास ते वाहन ताब्यात घेण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त यांना असेल.

वाहनांच्या वापरावरील बंदी ही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी वापरण्याचा प्रयत्न केला जाईल अशा वाहनांच्या बाबतीतच लागू होईल. संबंधित वाहने ज्या विभाग प्रमुखांच्या अखत्यारित आहेत, सदर विभाग प्रमुख निवडणुकीमध्ये प्रचारामध्ये वाहनाच्या गैरवापराबाबत व्यक्तिशः जबाबदार राहतील. तसेच ज्या अधिकाऱ्याच्या प्रभाराखाली अशी वाहने सोपविलेली असतील ते अधिकारीसुध्दा यासंदर्भात तेवढेच जबाबदार असतील.

आचारसंहितेच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर होत असल्यास त्यावर लक्ष ठेवण्यासाठी महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी अधिकारी नेमून त्यांच्यावर संबंधित प्रभागांची जबाबदारी निश्चित करावी. सदर अधिकाऱ्यांनी वाहनांचा गैरवापर होत आहे किंवा कसे, यावर लक्ष ठेवावे. वाहनांचा निवडणूकविषयक कामासाठी गैरवापर होत असल्याचे आढळून आल्यास अशी वाहने अधिग्रहित करण्याची कार्यवाही करावी व सदर वाहने निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ताब्यात राहतील.

आचारसंहितेच्या कालावधीत केंद्र शासनाची, राज्य शासनाची वा इतर सार्वजनिक उपक्रमांची विमाने किंवा हेलिकॉप्टर्स प्रचार दौऱ्याकरिता राजकीय नेत्यांनी वापरण्यावर पूर्णपणे बंदी असेल. राजकीय नेते यामध्ये मंत्र्यांचाही समावेश होतो. भारताचे प्रधानमंत्री मात्र शासकीय विमानाने अथवा हेलिकॉप्टरने प्रवास करु शकतील.

प्रचाराकरिता खाजगी विमाने अथवा हेलिकॉप्टर्स यांचा वापर करता येईल. मात्र त्याचा खर्च पक्षाने करावयाच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र.१७/का.५, दिनांक ०८/११/२०११ अन्वये महत्वाचे राजकीय नेते/प्रचारक (star campaigner) यांची नावे कळविण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार उमेदवाराच्या खर्चामध्ये केवळ ज्यांची नावे महत्वाचे राजकीय प्रचारक (star campaigner) म्हणून कळविण्यात आली आहेत त्यांच्या प्रवासाचा खर्च समाविष्ट होणार नाही.

**(११) वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करणेबाबत :-** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/१०९५/३०६/डेक्स-३, दिनांक ०२/०३/१९९५ अनुसार महानगरपालिका आयुक्त अथवा जिल्हाधिकारी हे निवडणुकीच्या कामाकरिता वाहने, कर्मचारी व मालमत्ता अधिग्रहित करण्याकरिता सक्षम असून सदर आदेशांचे उल्लंघन करणारी व्यक्ती आदेशात नमूद शिक्षेस पात्र राहील.

**(१२) शस्त्रास्त्र बंदी :-** निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास निर्बंध घालणे आवश्यक आहे. ही बंदी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील व यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी अथवा अन्य संबंधित पोलीस अधिकारी यांच्याकडून काढले जातील, याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांनी घ्यावी.

**(१३) दारुबंदी-** मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व निकालाच्या दिवशी मद्यविक्रीवर बंदी राहील. व कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी संपूर्ण आचारसंहितेच्या काळात दारुचे वाटप करु शकणार नाही. यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.एसईसी/१०९५/सी.आर.१/९५/डेक्स ३, दिनांक ०७/०३/१९९५ लागू रहातील.

**(१४) ध्वजारोहण व शासकीय सण:-** आचारसंहितेच्या कालावधीत प्रजासत्ताक दिन अथवा स्वातंत्र्य दिन असे दिवस आल्यास ध्वजारोहण करण्यासंदर्भात

विचारणा होत असते. यासंदर्भात असे नमूद करण्यात येते की, महानगरपालिकांमध्ये महापौरांनी, जिल्हा परिषदांमध्ये जिल्हा परिषद अध्यक्ष, नगर परिषद /नगर पंचायतीमध्ये त्यांच्या अध्यक्षानी, पंचायत समितीच्या सभापतींनी व ग्रामपंचायतीमध्ये सरपंचांनी प्रजासत्ताक दिनी अथवा स्वातंत्र्य दिनी ध्वजारोहण करण्यास हरकत नाही. तथापि, अशा कार्यक्रमांच्या नेहमीच्या स्थळामध्ये बदल करण्यात येऊ नये. तसेच या समारंभात करावयाची भाषणे स्वातंत्र्य मिळविण्यासाठी बलिदान केलेल्या हुतात्म्यांचा तसेच देशाचा गौरव यापुरतीच मर्यादित ठेवण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत या समारंभात निवडणूक प्रचाराविषयी भाषणे करता येणार नाहीत. या सूचना महाराष्ट्र दिन, सद्भावना दिन, मराठवाडा दिन अशा अन्य दिवसांसाठीही लागू राहतील.

**(१५) इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचार करणेबाबत:-** इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी यासंदर्भात महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालयात गठीत केलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे देखील प्रचारावर बंदी राहील. यामध्ये एसएमएसचा देखील समावेश होतो.

**(१६) निवडणूक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स लावण्याबाबत:-** निवडणूक प्रचार मोहिमांच्यावेळी राजकीय पक्षांचे व उमेदवारांचे कार्यकर्ते खाजगी व सार्वजनिक इमारतींच्या भिंतीवर निवडणूकविषयक भित्तीपत्रके चिकटवून, घोषणा लिहून, निवडणूक चिन्हे रंगविण्यासाठी भिंतीचा वापर करतात. तसेच या गोष्टी इमारतींच्या मालकांची परवानगी न घेताच केल्या जातात व त्यांना त्या अतिशय त्रासदायक ठरतात. याबाबतीत सध्या अस्तित्वात असलेला सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंध कायदा, १९८४ व तसेच खाजगी वा सरकारी मालमत्ता विद्रुपन कायदा, १९९६ खाली असलेल्या तरतुदी पुरेशा परिणामकारक आहेत, वरील प्रकारची अनिष्ट कृत्ये करणाऱ्या पक्षांविरुध्द/व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. राज्य निवडणूक आयोगाने मालमत्ता विद्रुपिकरणासंदर्भात पत्र क्र.एसईसी/१०९५/सी.आर.२५/९५/आरआर, दिनांक २१/०१/१९९५ अन्वये दिलेल्या सूचना यासंदर्भात लागू राहतील.

निवडणुका सुरु असलेल्या कालावधीत राजकीय पक्ष वा उमेदवार यांनी त्यांच्या अनुयायांना चिन्हे लावणे, फलक लावणे, नोटीसा चिकटविणे व घोषणा लिहिणे इत्यादींसाठी वैयक्तिक जमीन, इमारती, भिंती इत्यादींचा मालकांच्या लेखी परवानगीशिवाय वापर करण्यास अनुमती देता कामा नये. तसेच राजकीय पक्ष वा उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते व यांना कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक इमारतींवर आपली भित्तीपत्रके चिकटविणे, घोषणा लिहिणे, आपली निवडणूक चिन्हे रंगविणे अशा प्रकारे खराब करण्याचे अधिकार नाहीत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कोणत्याही अधिकाऱ्याने/कर्मचाऱ्याने असे कृत्य पाहिल्यास अथवा ते त्यांच्या कोणी निदर्शनास आणून दिल्यास मालमत्ता विद्रुपित करण्यासंदर्भात अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा.

पोस्टर, बॅनर इत्यादीबाबत परवानगी, प्रचाराचा कालावधी संपेपर्यंतच्या कालावधीसाठी देण्यात येईल. प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सदर साहित्य संबंधितांनी तात्काळ काढून टाकणे आवश्यक राहील.निवडणुकांच्या संदर्भात राजकीय पक्ष/उमेदवारांनी संबंधितांची लेखी परवानगी न घेता खाजगी मालमत्तेवर त्यांची भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे इत्यादी चिकटवून किंवा लिहून ती मालमत्ता विद्रुपित केली असल्यास त्यांनी सदर भित्तीपत्रके, घोषणा, निवडणूक चिन्हे, पोस्टर्स, बॅनर्स काढून टाकून ती मालमत्ता पूर्ववत करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्यात.

**(१७) निवडणूक आचारसंहितेमध्ये येणा-या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत-** ब-याचदा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या कालावधीत गणेशोत्सव, रमझान असे सण येतात. गणेशोत्सव व रमझान महिन्यात बरेच सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्रात सार्वजनिक गणेशोत्सवदेखील सर्वच गांवांमधून आयोजित करण्यात येतो. रमझान महिन्यात इफ्तार भोजनदेखील आयोजित करण्यात येते. या सर्व कार्यक्रमांमुळे आचारसंहितेस बाधा येऊ शकते काय अशी विचारणा वेगवेगळया स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येते. सर्व बाबींचा विचार करुन व सामाजिक सलोखा लक्षात ठेवून विशेष बाब म्हणून राज्य निवडणूक आयोग या कार्यक्रमाबद्दल पुढीलप्रमाणे मार्गदर्शक तत्वे ठरवून देत आहे :-

१) राजकीय पक्षाचे नेते अथवा कार्यकर्ते सार्वजनिक गणेशोत्सव व रमझान मध्ये होणाऱ्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होऊ शकतात.

२) गणेशोत्सवामध्ये एखाद्या मंडळाचे विश्वस्त किंवा पदाधिकारी म्हणून एखादी राजकीय व्यक्ती असल्यास तिचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर राहू शकते. परंतु, तेथे ते कुठल्या पक्षाशी संबंधित आहे किंवा कुठल्या प्रभागातील उमेदवार आहे याचा उल्लेख नको. जे विश्वस्त वा पदाधिकारी नाहीत त्यांच्या नावाचा कार्यक्रम पत्रिकेवर उल्लेख करण्यात येऊ नये.

३) कार्यक्रम पत्रिकेवर अथवा गणेशोत्सव अथवा रमझानासंबंधी फलकावर कोणत्याही राजकीय नेत्याचा फोटो तसेच नावही ठळकपणे नको.

४) गणेशोत्सव व रमझान या सणांमध्ये कोणत्याही राजकीय नेत्याचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये.

५) गणेशोत्सव व रमझानच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याने अथवा उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करु नये अथवा त्यासाठी कुठल्याही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा आधार घेऊ नये.

वरील सूचना गणेश विसर्जनाच्या कार्यक्रमासही लागू राहतील. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका आहे तेथे संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रासाठी या सूचना लागू राहतील. जे इतर सण सार्वजनिकरित्या साजरे करण्यात येतात उदा.नवरात्र, त्यांच्यासाठीही या सूचना लागू राहतील. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पोटनिवडणुका आहेत तेथे संबंधित प्रभागांमध्ये या सूचनांचे पालन होईल याची खात्री संबंधित अधिकाऱ्यांनी करावी.

**(१८) मतदान केंद्रातील प्रवेशाबाबत :-** मतदानाच्या दिवशी मंत्री अथवा राज्यमंत्री महोदय शासकीय वाहनांचा ताफा तसेच पोलीस सुरक्षा इत्यादी सोबत घेऊन मतदान केंद्रांना भेटी देत असल्याच्या तक्रारी राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त होतात. वास्तविक पाहता, केंद्र तथा राज्य शासनाच्या मंत्री/राज्यमंत्री/उपमंत्री यांनी आपली सुरक्षा यंत्रणा तसेच शासकीय वाहने इत्यादी घेऊन मतदान केंद्रांना भेटी दिल्यास मतदान करण्यासाठी आलेल्या मतदारांवर प्रभाव पडण्याची शक्यता नाकारता येत नाही व अशा प्रकारामुळे निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पडण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. यास्तव मतदान केंद्रामध्ये मतदार/मतदान अधिकारी/उमेदवार/त्यांचे निवडणूक प्रतिनिधी व नियमानुसार नेमलेले मतदान प्रतिनिधी, राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेले अधिकारी, मतदाराच्या कडेवरील लहान मूल व अंध अथवा अपंग मतदारासोबत द्यावयाचा सोबती याव्यतिरिक्त मतदान केंद्रात कोणीही प्रवेश करु नये. मतदान केंद्रावर सुरक्षेसाठी नेमलेला पोलिस कर्मचारी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून काही न टाळता येण्याजोग्या घटना घडल्यास मतदान केंद्राध्यक्षांच्या अनुमतीनेच मतदान केंद्रात प्रवेश करु शकतात. यास्तव मंत्री, राज्यमंत्री, उपमंत्री इत्यादींनी त्यांचे नाव ज्या मतदान केंद्रात आहे, अशा मतदान केंद्रात फक्त मतदान करण्यासाठीच प्रवेश करावा. अन्य कोणत्याही मतदान केंद्रात त्यांना प्रवेश देऊ नये अथवा त्यांनी भेट देऊ नये. या सूचनांचे सर्व संबंधितांकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल, याची दक्षता घेण्यात यावी.

**(१९) व्हिडिओ चित्रिकरण करणेबाबत:-** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये संबंधित महानगरपालिका आयुक्तांनी अथवा जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश दिले असतील तरच व्हिडिओ चित्रिकरण करण्यात येईल. राज्य निवडणूक आयोगाने जर एखाद्या स्थानिक स्वराज्य संस्थेबाबत विशेष आदेश दिले असतील तर त्याचे पालन करणे आवश्यक असेल.

**कशाचे चित्रण करावे ?**

१. मंत्र्यांनी, राष्ट्रीय / राज्य पातळीवरील मान्यताप्राप्त पक्षाच्या अग्रणी नेत्यांनी ज्या सभेमध्ये भाषण केलेले असेल / ज्या सभेत ते उपस्थित राहिलेले असतील अशा सभा.

२. दंगे किंवा दंग्यांची परिस्थिती किंवा विक्षोभ, दगडफेक, बेभान जनता इत्यादी.

३. हिंसक घटना, मालमत्तेची हानी, लूटमार, जाळपोळ, शस्त्र परजणे इत्यादी.

४. मतदान केंद्र ताब्यात घेणे.

५. मतदारांना धाकदपटशा दाखविणे.

६. साडी, धोतर,चादर इत्यादी वस्तू वाटप करुन मतदारांना उघड उघड लाच देणे.

७. मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या परिसराच्या आत प्रचार करणे.

८. मोठया पोस्टर्सवर होणारा अनावश्यक खर्च इत्यादी.

**कशाचे चित्रण करु नये?**

१. मतदान केंद्राबाहेर लावलेल्या सुव्यवस्थित रांगा.

२. मतमोजणी सभागृहातील दृश्य.

३. दारोदार करण्यात येणारा प्रचार.

४. प्रचारासाठी ध्वनिवर्धक संच जोडलेली फिरती वाहने.

व्हिडिओ चित्रण करणाऱ्या चमूबरोबर जो अधिकारी असेल तो त्या कामासंबंधी गुप्तता राखण्यात येत आहे आणि त्या व्हिडिओ चित्रफिती कुणाच्याही दुसऱ्याच्या हाती जाणार नाहीत आणि त्या चित्रफितींच्या कुठल्याही भागाची हानी झालेली नाही किंवा ती खराब झालेली नाही याची खातरजमा करील.

**(२०) ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत :-** ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असेल. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपकाच्या वापरावर बंदी राहील.यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.एसईसी/१०९५/सी.आर.९/९५/डेस्क-३, दिनांक १८/०३/१९९५ अन्वये ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत दिलेल्या सूचना लागू राहतील.

**(२१) प्रचार संपल्यानंतर हद्दीमध्ये वास्तव्य न करणेबाबत :-** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.४/का.५, दिनांक०९/०४/२०११ अन्वये प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदार नसलेल्यांना त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीमध्ये वास्तव्य न करण्याचे आदेश दिले आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांना पोलीस, हद्दीबाहेर हलविण्याबाबतची कार्यवाही करु शकतील.

**(२२) आचारसंहितेच्या कालावधीमध्ये नेमणुका / भरती करण्याच्यादृष्टीने जाहिराती देणे, मुलाखती घेणे व प्रत्यक्ष नियुक्त्या करणेबाबतः-** आचारसंहितेच्या कालावधीमध्ये शासन सेवेत तसेच निमसरकारी संस्था, शासकीय मंडळे / महामंडळे सार्वजनिक उपक्रम इ. संस्थांमध्ये भरती करण्याच्यादृष्टीने जाहिरात देणे, मुलाखती घेणे इ. करण्यात येऊ नये. आचारसंहिता लागू होण्यापूर्वीच पत्रे पाठविले असल्यास लेखी परीक्षा घेण्यास हरकत नाही. तथापि, त्याचा निकाल जाहीर करता येणार नाही. तसेच मुलाखती व प्रत्यक्ष नेमणुका याबाबतची कार्यवाही आचारसंहिता कालावधीत करता येणार नाही. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्यात येणाऱ्या सेवाभरतीसाठी ही अट लागू असणार नाही.

**(२३) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्वसाधारण सभा व बैठका -** स्थानिक स्वराज्य संस्थेमधील विविध समित्यांच्या (विषय समित्या इ.) बैठका ज्या कायद्यानुसार घेणे बंधनकारक आहे, त्या घेता येतील. परंतु नेमणुका, अनुदान, कर्ज अथवा आर्थिक सहाय्य मंजूर किंवा अदा करण्यात येऊ नये. तसेच मतदारांवर कोणत्याही प्रकारे प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येणार नाहीत.

**(२४) राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचारसंहिता**

**(अ) सर्वसाधारण वर्तणूक-**

१. **राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घोषित केल्यापासून कोणतेही मंत्री, अथवा इतर प्राधिकारी यांनी**

(क) कोणत्याही प्रकारची वित्तीय अनुदाने देण्याची किंवा ती देण्याबाबतची अभिवचने घोषित करता कामा नयेत.

(ख) कोणत्याही प्रकारचे प्रकल्प किंवा योजना यांच्या कोनशिला बसवता कामा नयेत, किंवा

(ग) रस्त्यांचे बांधकाम करण्याची किंवा पिण्याच्या पाण्याची सुविधा इत्यादींसाठी तरतूद करण्याबाबत कोणतेही अभिवचन देता कामा नये, किंवा

(घ) शासन, सार्वजनिक उपक्रम तथा स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादीमध्ये कोणतीही तदर्थ नियुक्ती करता कामा नये. तसे केल्यास सत्तारुढ पक्षाच्या बाजूने मतदारांवर प्रभाव पाडल्यासारखे होईल.

२. **पक्षाचा खर्च -** पक्षाने निवडणुकांकरिता केलेला खर्च राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१७/का.५, दिनांक २८/१२/२००६ अन्वये विहित वेळापत्रकानुसार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे सादर करणे आवश्यक आहे.

३. **घोषणा व जाहिराती -** वित्तीय अनुदाने किंवा इतर कल्याणकारी योजना घोषित करण्याच्या संबंधात निवडणूक आचारसंहितेत वर उद्धृत करण्यात आल्याप्रमाणे सर्व मनाई आदेश हे निवडणुका घोषित करण्यात आल्यानंतरच लागू होतील याची आयोगाला जाणीव आहे. तथापि, केंद्रातील आणि महाराष्ट्रातील व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्तारुढ पक्षांनी निरनिराळया प्रकारच्या कल्याणकारी योजना आणि इतर सवलतींची घोषणा करुन, तसेच सार्वजनिक पैशांतून मुद्रित होणाऱ्या किंवा इलेक्ट्रॉनिक माध्यम इत्यादीद्वारे केंद्रात आणि राज्यातील शासनाच्या कामगिऱ्या ठळकपणे निदर्शनास आणून देऊन शासन पुरस्कृत रीतीने आपल्या पक्षाचा प्रचार वाढविण्यासाठी अधिकाराचा वापर करत असतील तर राज्य निवडणूक आयोग त्याची तात्काळ दखल घेईल. आणि तसे करण्यावर बंदी आणील.

४. **धार्मिक तणाव -** कोणताही पक्ष अथवा उमेदवार, वेगवेगळया जाती आणि धार्मिक किंवा भाषिक अथवा सामाजिक गट यांच्यामध्ये मतभेद होणारी किंवा त्यांच्यामध्ये ज्यामुळे परस्परांमध्ये द्वेष किंवा तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करणार नाही.

५. **प्रतिस्पर्ध्यांवरील टीका -** इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती पक्षांची धोरणे किंवा कार्यक्रम, त्यांचे पूर्वीचे कार्य यांच्यापुरती मर्यादित असेल. पक्षाच्या नेत्यांच्या किंवा कार्यकर्त्यांच्या सार्वजनिक कामांशी संबंधित नसलेल्या, खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करण्यापासून, पक्ष आणि उमेदवार दूर राहतील. बिनबुडाचे आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका केली जाणार नाही.

राजकीय पक्ष आणि उमेदवारांना एखाद्या व्यक्तीची राजकीय मते वा कामे कितीही नापसंत असली तरी आपापल्या घरात शांत आणि स्वस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक माणसाच्या अधिकारांचा आदर केला जाईल. लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे देणे या उपायांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही.

६. **प्रार्थना स्थळांचा वापर -** मते मिळविण्याकरिता धर्म, जात, वर्ग अथवा गट भावनांना आवाहन केले जाणार नाही. कोणत्याही प्रार्थनास्थळांचा निवडणूक प्रचाराचे व्यासपीठ म्हणून वापर केला जाणार नाही.

७. **मतदारांना प्रलोभन / धाक -** मतदारांना लाच देणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, मतदारांची तोतयेगिरी, मतदान केंद्राजवळच्या १०० मीटर्स क्षेत्रामध्ये प्रचार करणे, या बाबी कारवाईस पात्र ठरतील. मतदानापूर्वी जाहीर प्रचार बंद करण्यासंबंधी तरतुदींचे पालन करणे आवश्यक राहील. तसेच प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहतुकीची आणि वाहनांची व्यवस्था करणे यासारख्या "भ्रष्टाचाराच्या" आणि निवडणूक कायद्यांतर्गत गुन्हा समजल्या जाणाऱ्या गोष्टी, सर्व पक्ष आणि उमेदवार कटाक्षाने टाळतील.

८. **बॅनर लावण्यास घर मालकाची परवानगी -** कोणताही राजकीय पक्ष वा उमेदवार ध्वजदंड उभारण्यासाठी, फलक टांगण्यासाठी, सूचना चिटकविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी वगैरे कोणत्याही व्यक्तीच्या जमीन, इमारत, कुंपण इत्यादींचा त्याच्या मालकाच्या परवानगीशिवाय वापर करणार नाही. तसेच यासंदर्भात संबंधित महानगरपालिका अथवा जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडूनही परवानगी आवश्यक असेल.

९. **मतदान प्रतिनिधी नियुक्तीबाबत-** मतदान प्रतिनिधी म्हणून नियुक्त करावयाची व्यक्ती संबंधित प्रभागात रहाणारी असावी व तिला मतदार ओळखता यावे. ज्या उमेदवारांना मतदान प्रतिनिधी नेमावयाचा आहे. त्यांनी मतदान प्रतिनिधी किंवा त्याचा **परिहार** प्रतिनिधी यांची नावे व पत्ते निवडणुकीच्या दिनांकापूर्वी **किमान एक दिवस** आधी निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवावीत. ज्या व्यक्तींविरुध्द गुन्हेगारीची नोंद असेल किंवा निवडणूक विषयी गैरव्यवहारात समाविष्ट असल्याची पूर्वीची नोंद असेल किंवा त्यांच्या वर्तणुकीमुळे मतदारांमध्ये दहशत पसरू शकेल अथवा ज्या व्यक्तीचा मतदारांवर प्रभाव पडेल अशा व्यक्तींना मतदान प्रतिनिधी म्हणून नेमू नये.

१०. **मुद्रक व प्रकाशकाचे नाव छापणेबाबत-** प्रचारासाठी छापण्यात येणाऱ्या साहित्यावर मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे.

११. **प्रचार फेरीतील वाहनांबाबत :-** प्रचार फेरी किंवा मिरवणुका यामध्ये किती वाहने वापरावित याबाबत राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२००६/प्र.क्र.१९/का.५, दि.१९/१०/२००६ अन्वये आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांकरिता जास्तीत जास्त ३ वाहने वापरता येतील. तर ग्रामपंचायत निवडणुकांकरिता जास्तीत जास्त १ वाहन वापरता येईल. राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त वाहने आढळल्यास प्रचार फेरी किंवा मिरवणुकीची परवानगी तात्काळ रद्द करण्यात यावी.

१२. **प्रचार कार्यालयांची संख्या -** उमेदवारांना किती प्रचार कार्यालये काढण्याची परवानगी असेल अशीही विचारणा काही निवडणूक अधिकाऱ्यांकडून होत असते, यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा/२००७/ प्र.क्र.६/का.५, दि.०९/०५/२००७ अन्वये असे आदेश दिले आहेत की, १५ लाखापर्यंत लोकसंख्या असलेल्या प्रत्येक नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक प्रभागांसाठी उमेदवारास एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. १५ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये प्रत्येक प्रभागात दोन प्रचार कार्यालये उघडण्याची परवानगी असेल. जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गण यामध्ये येणाऱ्या प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रासाठी एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल. ग्रामपंचायत निवडणुकांकरिता प्रत्येक प्रभागासाठी उमेदवाराला एक प्रचार कार्यालय उघडण्याची परवानगी असेल.

## (ब) सभा

१. **सभेच्या परवानगीबाबत -** स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना वाहतुकीचे नियंत्रण करणे आणि शांतता आणि सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे यासाठी पक्ष किंवा उमेदवारास, कोणत्याही प्रस्तावित सभेची जागा आणि वेळ त्यांना पुरेशा कालावधी अगोदर कळविणे बंधनकारक असेल. सभेसाठी प्रस्तावित केलेल्या जागेत कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले आहेत किंवा कसे, याबद्दल पक्ष किंवा उमेदवार अगोदर खात्री करुन घेईल. अशा आदेशांमधून काही सूट हवी असल्यास, त्यासाठी अर्ज करुन अशी सूट अगोदर प्राप्त केली जाईल.

२. **ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत-** ध्वनिवर्धकाचा वापर करण्यासाठी किंवा प्रस्तावित सभेच्या संदर्भात इतर कोणत्याही सुविधेसाठी परवानगी किंवा लायसन्स मिळवावयाचे असल्यास पक्ष किंवा उमेदवार संबंधित प्राधिकाऱ्याकडे त्यासाठी पुरेसे अगोदर अर्ज करुन अशी परवानगी किंवा लायसन्स प्राप्त करील.

३. **सभेमध्ये अडथळा निर्माण न करणेबाबत -** आपले समर्थक, इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा किंवा मिरवणुका यामध्ये अडथळा निर्माण करीत

नाहीत किंवा ते उधळून लावीत नाहीत याची राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी दक्षता घ्यावी. एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थक, दुसऱ्या पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभांमध्ये तोंडी किंवा लेखी प्रश्न विचारुन किंवा स्वत:च्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा निर्माण करणार नाहीत. एक पक्ष सभा घेत असेल अशा ठिकाणी दुसरा पक्ष मिरवणूक घेऊन जाणार नाही. एका पक्षानें लावलेली भित्तीपत्रके दुसऱ्या पक्षाचे कार्यकर्ते काढणार नाहीत. सभेमध्ये अडथळा उत्पन्न करणाऱ्या किंवा इतर मार्गांनी गोंधळ माजविणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्याकरिता सभेचे आयोजक कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांची मदत न चुकता घेतील. आयोजक स्वत: अशा व्यक्तींविरुध्द कारवाई करणार नाहीत.

## (क) मिरवणुका

१. **मिरवणुकीची वेळ व जागा निश्चितीबाबत -** पक्ष किंवा उमेदवार, मिरवणूक सुरु होईल ती वेळ किंवा आणि ती जेथून जाईल तो मार्ग आणि मिरवणूक संपेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करील. कार्यक्रमांमध्ये सहसा बदल होणार नाही. कार्यक्रमाच्यावेळी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांनी आवश्यक ती व्यवस्था करण्यात यावी यासाठी आयोजक त्यांना कार्यक्रमासंबंधी सर्व माहिती आगाऊ पुरवतील. मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागात काही निर्बंधक आदेश जारी असतील तर आयोजक त्याबद्दल खातरजमा करुन घेतील आणि सक्षम प्राधिकाऱ्यांनी त्यामधून मुद्दाम सूट दिली नसल्यास, त्या निर्बंधाचे अनुपालन करतील. वाहतुकीच्या विनियमांचे आणि निर्बंधांचेही काळजीपूर्वक पालन केले जाईल.

२. **वाहतूक नियंत्रणाबाबत -** वाहतुकीची कोंडी होऊ नये किंवा तिला अडथळा होऊ नये अशा रीतीने मिरवणूक नेण्याची व्यवस्था करण्यासाठी आयोजक आगाऊ उपाय योजना करतील. मिरवणूक जर खूप लांब असेल तर तिचे सोयीस्कर आकाराच्या तुकडयांमध्ये विभाजन केले जाईल, ज्यायोगे काही ठराविक स्थळांवर, विशेषत: मिरवणुकीला चौकांमधून जावयाचे असेल तेव्हा अडकलेल्या वाहतुकीला टप्प्याटप्प्याने मोकळे करता येईल आणि वाहतुकीची कोंडी होणे टाळता येईल. मिरवणुकीसंबंधी कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांचे निदेश आणि सल्ला यांचे काटेकोरपणे अनुपालन केले जावे.

३. **दोन मिरवणुका समोरासमोर येऊ न देणेबाबत -** दोन किंवा त्यापेक्षा अधिक राजकीय पक्ष एकाच मार्गावरुन किंवा त्याच्या भागांवरुन साधारणपणे एकाच वेळी मिरवणूक नेण्याचे ठरवित असतील तर आयोजक पुरेसे अगोदर संपर्क प्रस्थापित करतील आणि मिरवणुकी एकमेकांसमोर येणार नाहीत किंवा त्या वाहतुकीला अडथळा करणार नाहीत यादृष्टीने काय उपाययोजना करावयाच्या ते निश्चित करतील. समाधानकारक उपाययोजना निश्चित करण्यासाठी स्थानिक पोलिसांची मदत घेतली जाईल. पक्ष या प्रयोजनासाठी पोलिसांशी शक्य तेवढया लवकर संपर्क साधतील.

४. **मिरवणुकीदरम्यान बाळगावयाच्या वस्तूंबाबत -** असामाजिक तत्वांकडून, विशेषतः प्रक्षुब्ध मनःस्थितीत ज्यांचा दुरुपयोग केला जाऊ शकेल अशा, धारदार वस्तू किंवा शस्त्रे जवळ बाळगता येणार नाहीत. बाळगलेली आढळल्यास ती जप्त करण्यात येतील.

५. **प्रतिकृतींच्या वापराबाबत -** इतर राजकीय पक्षांचे, सदस्यांचे किंवा त्यांच्या नेतृत्वाचे प्रतिनिधीत्व करीत असल्याचे समजल्या जाणाऱ्या त्यांच्या प्रतिकृती घेऊन जाणे, त्यांचे जाहीरपणे दहन करणे हे आणि असे निदर्शनांचे प्रकार कोणत्याही पक्षाकडून किंवा उमेदवाराकडून चालवून घेतले जाणार नाहीत.

६. **प्रचार फेरीवरील खर्चाबाबत-** प्रचारफेरी किंवा प्रचार मिरवणुकीत महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समिती यांच्या क्षेत्रांमध्ये जास्तीत जास्त तीन वाहनांचा समावेश करण्यात येईल. ही प्रचार फेरी अथवा मिरवणूक जर एकाच उमेदवाराची असेल तर त्या उमेदवाराने त्या प्रचार फेरीचा येणारा खर्च आपल्या खर्चात समाविष्ट केला पाहिजे. जर प्रचार फेरी पक्षातर्फे अथवा आघाडीतर्फे काढण्यात आली असेल तर ती प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

## (ड) मतदानाचा दिवस

१. **निवडणूक यंत्रणेशी सहकार्य करणेबाबत-** मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजित रितीने पार पडावे आणि मतदारांना कोणाच्या दबावाला किंवा अडथळयांना बळी न पडता स्वतंत्रपणे मताधिकार वापरता यावा यासाठी मतदार निवडणुकीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांशी पूर्णपणे सहकार्य करतील.

२. **बिल्ले व ओळखपत्रे-** उमेदवार त्यांच्या अधिकृत कार्यकर्त्यांना विहित परवानगी घेऊन योग्य असे बिल्ले आणि ओळखपत्रे निवडणूक प्रशासनाकडून मिळवतील.

३. **मतदारांना द्यावयाच्या ओळखचिठ्ठया -** उमेदवारांनी मतदारांना पुरविलेल्या ओळखचिठ्ठया स्वच्छ पांढऱ्या कागदाच्या आहेत आणि त्यांच्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव नाही याची खातरजमा करुन घेतली जाईल.

४. **दारुबंदीबाबत-** मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व निकालाच्या दिवशी मद्यविक्रीवर बंदी राहील व कोणताही उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी संपूर्ण आचारसंहितेच्या काळात दारुचे वाटप करु शकणार नाही.

५. **उमेदवाराच्या तात्पुरत्या कार्यस्थानाबाबत -** कार्यकर्ते आणि पक्षाचे व उमेदवारांचे समर्थक यांच्यामधील संघर्ष आणि तणाव टाळण्याच्या दृष्टीने पक्षांनी आणि उमेदवारांनी मतदान केंद्राजवळ उभारलेल्या तात्पुरत्या कार्यस्थानाजवळ विनाकारण गर्दी होऊ देऊ नये. सदर कार्यस्थळाच्या दर्शनी भागावर कोणतेही भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावलेले असणार नाही. तेथे कोणत्याही खाद्यवस्तूंचे वाटप केले जाणार नाही किंवा गर्दी होईल अशी कोणतीही कृती केली जाणार नाही.

६. **मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत -** मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत राज्य निवडणूक आयोगाचे क्र.एसईसी/जीईएन-११९८/प्र.क्र.१/का.३, दिनांक ०६/०१/१९९८ च्या आदेशान्वये दिलेल्या निर्बंधाचे अनुपालन करताना सर्व पक्षांचे उमेदवार व कार्यकर्ते संबंधित प्राधिकाऱ्याशी सहकार्य करतील आणि वाहने चालविताना त्यासाठी आवश्यक परवाने मिळवून ते त्या वाहनांच्या दर्शनी भागांवर ठळकपणे लावले जातील. मतदानाच्या दिवशी वापरावयाच्या वाहनांच्या मर्यादेमध्ये बदल करण्यात येत असून त्यानुसार मतदानाच्या दिवशी प्रत्येक उमेदवारास स्वतःच्या वापरासाठी एक वाहन वापरण्याचा अधिकार असेल. त्याव्यतिरिक्त त्याचे निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्या उपयोगासाठीही एक वाहन देता येईल. परंतु, हे वाहन त्याच्या मतदार संघातच वापरले पाहिजे.

७. **मतदान केंद्रात उमेदवाराच्या प्रवेशाबाबत -** राज्य निवडणूक आयोगाच्या असे लक्षात आले आहे की, उमेदवारांना मतदान केंद्रात प्रवेश करण्याची जी मुभा देण्यात आली आहे त्याचा गैरवापर केला जातो. यामध्ये मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात उमेदवाराने स्वतःची ओळख करुन देणे, मतदान केंद्रात वाजवीपेक्षा जास्त वेळ थांबणे याचा समावेश होतो. मतदारांना ओळख करुन देणे हे प्रकार निश्चितच प्रचारामध्ये मोडतात. तसेच वाजवीपेक्षा जास्त वेळ मतदान केंद्रात थांबणे हा प्रकारदेखील मतदार व निवडणूक यंत्रणा यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न असतो. असे प्रकार टाळण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला अशा सूचना देण्यात याव्यात की, मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या परिसरात त्याने कोणत्याही व्यक्तीला स्वतःची ओळख करुन देऊ नये किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा प्रचार करु नये. तसेच मतदान केंद्रात प्रवेश केल्यानंतर मतदान प्रक्रियेचे निरीक्षण दोन ते तीन मतदारांचे मतदान होईपर्यंतच करावे. त्यानंतर उमेदवाराने मतदान केंद्राच्या बाहेर पडणे अपेक्षित असेल. या सूचनांचा भंग करणाऱ्या उमेदवारास पोलिसांमार्फत त्या क्षेत्राच्या बाहेर काढावे.

८. **मतदारांची ने-आण करण्यास वाहनांच्या वापरास बंदी असल्याबाबत -** कोणत्याही उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी कुठल्याही वाहनाचा वापर करता येणार नाही. असे वाहन आढळल्यास पोलिसांनी ते तात्काळ ताब्यात घ्यावे.

९. **मतदानाच्या दिवशी वाहनांच्या सर्वसाधारण वापराबाबत :-** मतदानाच्या दिवशी सर्व प्रकारच्या वाहनांच्या रहदारीवर बंदी घालून जनतेला गैरसोय होईल असा निवडणूक आयोगाचा कोणताही हेतू नाही. निवडणुकीच्या कामाखेरीज अन्य आवश्यक असलेल्या खऱ्याखुऱ्या प्रयोजनांसाठी मतदानाच्या दिवशी पुढील प्रकारची वाहने वापरण्यास निवडणूक आयोगाची परवानगी असेल. त्याकरिता कोणताही अपवाद असणार नाही :-

(अ) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःच्या खाजगी वापरासाठी वापरण्यात येणारी खाजगी वाहने परंतु, निवडणुकीच्या कामाशी त्यांचा कोणताही संबंध नसावा.

(ब) खाजगी वाहनांच्या मालकांना त्यांच्या स्वतःसाठी किंवा त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील व्यक्तींसाठी मतदानाचा हक्क बजावता येण्याकरिता मतदान केंद्रावर जाण्यासाठी खाजगी वाहने वापरता येतील. परंतु, मतदान केंद्रापासून २०० मीटर त्रिज्येच्या आत अशी वाहने नेता येणार नाहीत.

(क) रुग्णालयातील वाहने, रुग्णवाहिका, दूधगाडया, वॉटर टँकर्स, तातडीच्या वीज पुरवठयाची वाहने, कामावर असलेल्या पोलिसांची वाहने, निवडणुकीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांची वाहने यासारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वापरण्यात येणारी वाहने.

(ड) ठराविक थांब्यावरुन व ठराविक मार्गांनी चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक परिवहन सेवेच्या बसगाडया.

(इ) विमानतळ, रेल्वे स्टेशन, आंतर-राज्यीय बस स्थानक, इस्पितळे येथे जाण्यासाठीचा जो प्रवास अनिवार्य ठरत असेल त्यासाठी टॅक्सी, तीन चाकी स्कूटर, रिक्षा इत्यादीचा वापर.

(फ) आजारी किंवा विकलांग व्यक्ती यांनी स्वतःच्या उपयोगासाठी केलेला खाजगी वाहनांचा वापर.

१०. **वाहनांच्या गैरवापराबाबत -** असे अनुभवास आले आहे की, निवडणूक कार्य कालावधीमध्ये उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी व पक्षनेते आणि त्यांचे पाठीराखे मतदार संघामधील एखादया उमेदवाराच्या पाठीराख्यांना येण्या-जाण्यासाठी खाजगी वाहनांचा वापर करतात आणि अनेक प्रसंगी झुंडशाही करणारे समाजकंटक मतदार संघातील मतदारांच्या मनामध्ये दहशत निर्माण करण्यासाठी उघड-उघड फिरत असतात. यामुळे मतदार एक तर ते विशिष्ट पक्षालाच/उमेदवारालाच मतदान करतात किंवा मतदान अजिबात करीत नाहीत. काहीवेळा निवडणुकीच्या काळात अशांतता निर्माण करण्याच्या हेतूने बेकायदेशीर शस्त्रे व दारुगोळयाची चोरटी ने-आण करण्यास ही वाहने वापरण्यात येतात.

अशा अनिष्ट/अवैध कृत्यांना पायबंद घालण्यासाठी निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे इतर पक्ष नेते यांच्यासोबतच्या व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांनी बेकायदेशीर दारुगोळा व शस्त्रास्त्रे वाहून नेणे यासारख्या गुन्हेगारी कृत्यांसह कोणत्याही संभाव्य अपकृत्यांवर जिल्हा प्रशासनाने बारीक लक्ष ठेवले पाहिजे. जर, या वाहनांपैकी एकतर पक्षाची किंवा खाजगी मालकीची वाहने, अशा कोणत्याही कृत्यांमध्ये किंवा मतदारांच्या मनात धाकदपटशा दाखविण्याच्या किंवा दहशत निर्माण करण्याच्या हेतूने समाजविघातक व्यक्तींची ने-आण करण्यासाठी वापरात असल्याचे दिसून आल्यास अशी वाहने अटकावून ठेवणे आणि निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना मुक्त न करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. याशिवाय, जे अशा अवैध कृत्यांमध्ये गुंतलेले आहेत असे वाहनांचे मालक, वहिवाटदार आणि उमेदवार/राजकीय पक्ष यांच्या विरुध्ददेखील कायदयानुसार फौजदारी कारवाई करण्यात येईल.

## (२५) "काय करावे"

१. चालू असलेले कार्यक्रम / योजना पुढे सुरु ठेवता येतील.

२. ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोग /महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/ मान्यता प्राप्त करण्यात यावी.

३. पूर, अवर्षण, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्ती यामुळे बाधित झालेल्या क्षेत्रातील जनतेसाठी साह्यकारी व पुनर्वसनाच्या उपाययोजना चालू करता येतील व चालू असलेल्या योजना पुढे सुरु ठेवता येतील.

४. मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना रोख रक्कम किंवा वैद्यकीय सवलती देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल.

५. मैदानासारख्या सार्वजनिक जागा सर्व पक्षांना/निवडणुकीत उभे असलेल्या उमेदवारांना निवडणूक सभा घेण्यासाठी निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजे. त्याचप्रमाणे सर्व पक्षांना/निवडणुकीस उभे असलेल्या उमेदवारांना हेलिपॅडचा वापर निःपक्षपातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे.

६. विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासस्थाने वगैरे बाबतीत निवडणूक आयोगाने व त्या अनुषंगाने शासनाने काढलेल्या आदेशास संपूर्णतया अधीन राहून सर्व राजकीय पक्षांना व निवडणुकीस उभे असलेल्या सर्व उमेदवारांना समानतेच्या तत्वावर उपलब्ध करुन देता येणे अनुज्ञेय असल्यास त्याप्रमाणे देण्यात यावेत.

७. इतर राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्यावर करण्यात येणारी टीका ही त्यांची धोरणे, कार्यक्रम, पूर्वीची कामगिरी, पार पडलेली कामे, केवळ याबाबींशी संबंधित असावी.

८. शांततामय व उपद्रवरहित गृहस्थ जीवन जगण्याच्या प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे.

९. प्रस्तावित सभेची जागा व वेळ याविषयी स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना पूर्ण माहिती देण्यात यावी आणि त्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानगी मिळविण्यात याव्यात.

१०. प्रस्तावित सभेच्या जागी निर्बंधात्मक व प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्यांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे.

११. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धक (Loudspeaker) किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे.

१२. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे.

१३. कोणत्याही मोर्चाच्या प्रारंभीची वेळ व जागा, मोर्चा ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मोर्चाची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.

१४. मोर्चा ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्याविषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे.

१५. मोर्चामुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये.

१६. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मोर्चात सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत.

१७. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे.

१८. बिल्ले व ओळखपत्रे, निवडणुकीचे काम करणाऱ्या व्यक्तींनी ठळकपणे लावली पाहिजेत.

१९. मतदारांना देण्यात येणाऱ्या ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर देण्यात येतील व त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे किंवा पक्षाचे नाव यांचा निर्देश असणार नाही.

२०. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.

२१. निवडणूक आयोगाचे, महानगरपालिका आयुक्त यांचे अथवा जिल्हाधिकाऱ्यांचे किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचे दिलेले वैध प्राधिकारपत्र असल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस कोणत्याहीवेळी मतदान कक्षात प्रवेश करता येणार नाही. वरच्या दर्जाच्या कोणत्याही व्यक्तींना (उदा.मा. मुख्यमंत्री, मंत्री, राज्यमंत्री, संसद सदस्य, विधानसभा सदस्य) यांनाही यातून सूट देण्यात आलेली नाही.

२२. निवडणूक पार पाडण्याच्या संबंधातील कोणतीही तक्रार किंवा समस्या, निवडणूक निर्णय अधिकारी / क्षेत्र / प्रभाग दंडाधिकारी यांच्या किंवा राज्य निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

२३. राज्य निवडणूक आयोग/आयुक्त, महानगरपालिका/जिल्हाधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंच्या संबंधातील सर्व बाबींविषयीचे निर्देश/आदेश /अनुदेश यांचे पालन करण्यात यावे.

### (२६) "काय करु नये"

१. शासकीय वाहने किंवा कर्मचारीवर्ग किंवा यंत्रणा यांचा निवडणूक प्रचारविषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. शासकीय वाहनात पुढील कार्यालयाच्या वाहनांचा समावेश असेल :-

(१) केंद्र शासन (२) राज्य शासन (३) केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे (४) केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त क्षेत्रातील उपक्रम (५) स्थानिक स्वराज्य संस्था (६) महानगरपालिका (७) नगर परिषदा/ नगर पंचायती (८) पणन मंडळ (कोणत्याही नावाचे) (९) सहकारी संस्था (१०) जिल्हा परिषदा/पंचायत समित्या /ग्रामपंचायती किंवा (११) ज्यामध्ये सार्वजनिक निधी मग तो एकूण निधीच्या हिश्श्यातील कितीही अल्पांशाने असो गुंतवण्यात आला आहे अशी कोणतीही संस्था आणि तसेच (१२) संरक्षण मंत्रालयाच्या मालकीची आणि गृह मंत्रालय व राज्य शासन यांच्या केंद्रीय पोलिस संघटनेच्या मालकीची असलेली पुढील वाहने -

मालमोटारी, लॉरी, टेंपो, जीपगाडया, मोटारगाडया, ऑटोरिक्षा, बसगाडया, विमाने, हेलिकॉप्टर, जहाजे, बोटी, हॉवर क्रॉफ्ट व इतर सर्व वाहने.

२. सत्तेमध्ये असलेला पक्ष/शासन यांनी साध्य केलेल्या उद्दिष्टांबाबत सरकारी कोषागाराच्या खर्चाने कोणतीही जाहिरात देऊ नये.

३. कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत.

४. शासन / सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ (Ad hoc) नियुक्त्या करु नयेत.

५. मंत्री, ते उमेदवार असल्याखेरीज किंवा प्राधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज किंवा मतदानासाठी मतदार या नात्याने असेल त्याखेरीज मतदान कक्षामध्ये किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाहीत.

६. निवडणूक मोहिम/प्रचार यांच्या जोडीने कोणतेही सरकारी काम पार पाडण्यात येऊ नये.

७. मतदारास आर्थिक किंवा अन्य प्रकारचे कोणतेही प्रलोभन दाखविण्यात येऊ नये.

८. मतदाराच्या जातीय व धार्मिक भावनांना आवाहन करण्यात येऊ नये.

९. विभिन्न जाती, जमाती यांच्यातील किंवा धार्मिक किंवा भाषिक गटातील मतभेद ज्यामुळे अधिक तीव्र होतील किंवा परस्परातील वैमनस्य वाढेल किंवा त्यांच्यात तणाव निर्माण होईल अशी कोणतीही कृती करण्याचा प्रयत्न करण्यात येऊ नये.

१०. इतर पक्षांचे कोणतेही नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कार्याशी संबंधित नसेल अशा त्यांच्या खाजगी जीवनातील कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

११. ज्यांचा खरे-खोटेपणा पडताळून पाहिलेला नाही असे आरोप ठेवून किंवा त्यास विकृत स्वरूप देऊन इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर टीका करण्यात येऊ नये.

१२. निवडणूक प्रचार तसेच भाषणे, निवडणूक प्रचाराचे फलक, संगीत इत्यादी साठी कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर करण्यात येऊ नये.

१३. **(अ)** लाच देणे, अवाजवी प्रभाव टाकणे, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, खोटया नावाने मतदान करणे, मतदारांना मतदान कक्षापर्यंत पोहोचविणे व तेथून

परत नेणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूकविषयक अपराध करण्यास प्रतिबंध आहेत.

**(ब)** निवडणूक प्रचार केव्हा समाप्त व्हावा, यासंदर्भात महानगरपालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या संबंधित कायद्यामध्ये वेगवेगळया तरतुदी आहेत. यास्तव, कायद्यातील या तरतुदीनुसार कायद्यामध्ये नमूद केलेल्या वेळेस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा प्रचार अवधी संपुष्टात येईल.

१४. व्यक्तींची मते किंवा कृत्ये याविरुध्द निषेध व्यक्त करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने किंवा धरणे धरण्यात येऊ नये.

१५. कोणत्याही व्यक्तीला, अन्य कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत आवारभिंत इत्यादींचा वापर त्यांच्या मालकांच्या परवानगीखेरीज करणे, ध्वजदंड उभारणे, कापडी फलक लावणे,नोटीशी चिकटविणे किंवा घोषणा इत्यादी लिहिणे यासाठी करता येणार नाही. यामध्ये खाजगी व सार्वजनिक जागांचा समावेश असेल.

१६. इतर राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवारांच्या सार्वजनिक सभांमध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण करण्यात येऊ नये.

१७. एका पक्षाची जेथे सभा चालू असेल अशा जागी दुसऱ्या पक्षाद्वारे मोर्चा काढण्यात येऊ नये.

१८. इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा व मिरवणुकीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण करु नयेत.

१९. दुसऱ्या पक्षांनी किंवा उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके काढून टाकण्यात येऊ नयेत.

२०. मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वितरीत करण्याच्या जागी किंवा मतदान कक्षानिकट प्रचारपत्रके, पक्षांचे ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये.

२१. ध्वनिवर्धकांचा मग ते एकाच जागी लावलेले असोत किंवा फिरत्या वाहनांवर बसविलेले असोत सकाळी ६.०० वाजण्यापूर्वी किंवा रात्री १०.०० वाजल्यानंतर आणि संबंधित प्राधिकाऱ्यांची लेखी पूर्व परवानगी घेतलेली असल्याखेरीज वापर करु नये.

२२. तसेच संबंधित प्राधिकाऱ्यांची पूर्व लेखी परवानगी असल्याखेरीज सार्वजनिक सभेच्या जागी किंवा मोर्चात ध्वनिवर्धकाचा वापर करु नये. अशा सभा / मोर्चे रात्री १०.०० वाजल्यानंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

याबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या अटींचे पालन करावे. याखेरीज, ती स्थानिक कायदे, त्या क्षेत्रातील सुरक्षिततेच्या आवश्यकतेचा स्थानिक दृष्टिकोन आणि हवामान, सणासुदीचा मोसम, परीक्षेचा काळ यांच्या अधीनतेने असतील.

२३. निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारच्या मद्याचे वाटप करण्यात येऊ नये.

या आदेशात ज्या बाबींविषयी तरतूद करण्यात आलेली नाही, अशा बाबींबाबत भारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या आदर्श आचारसंहितेतील तरतुदींप्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

आचारसंहितेची अंमलबजावणी योग्यरितीने करण्यात येईल याबाबत सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत. आचारसंहितेच्या अंमलबजावणीबाबत या आदेशात नमुद नसलेली काही अपवादात्मक परिस्थिती उद्‌भवल्यासच जिल्हाधिकारी यांनी स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा.

कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचा भंग झाल्यास तात्काळ नियमानुसार कार्यवाही करुन त्याचा अहवाल विनाविलंब आयोगास सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(डॉ.अशोक द.कोल्हे)
उपसचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त
सर्व प्रादेशिक संचालक व विभागीय आयुक्त, नगरपालिका प्रशासन
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य / अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी
निवड नस्ती कार्यासन ०५